मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# नरेंद्र मोदींकडून राजकारणाची चेष्टा

## रवींद्र धंगेकर यांच्या प्रचारासाठी आयोजित सभेत गांधी बोलत होते

**पिंपरी | प्रतिनिधी**

पुणे लोकसभा मतदारसंघात महाविकास आघाडीतर्फे काँग्रेसचे उमेदवार रवींद्र धंगेकर यांच्या प्रचारासाठी एसएसपीएमएसच्या मैदानावर आयोजित सभेत गांधी बोलत होते.

कर्नाटकमध्ये ४०० महिलांवर बलात्कार करणाऱ्या रवण्णाचा प्रचार पंतप्रधानांनी केला. शरद पवार यांच्यासारख्या ज्येष्ठ नेत्यांवर काहीबाही बोलून अपमान करतात. मोदी यांनी राजकारणाची चेष्टा चालवली आहे. मात्र, ते देशावर बोलत नाही, अशा शब्दांत काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर प्रहार केला.




पुणे लोकसभा मतदारसंघात महाविकास आघाडीतर्फे काँग्रेसचे उमेदवार रवींद्र धंगेकर यांच्या प्रचारासाठी एसएसपीएमएसच्या मैदानावर आयोजित सभेत गांधी बोलत होते. महाराष्ट्र प्रभारी रमेश चेन्नीथला, प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, बाळासाहेब थोरात, रजनी पाटील, आमदार डॉ. विश्वजित कदम, माजी आमदार अनंत गाडगीळ, नसीम खान, मोहन जोशी, चंद्रकांत हांडोरे, शहराध्यक्ष अरविंद शिंदे, संग्राम थोपटे आदी या वेळी उपस्थित होते. गांधी यांना शिंदे पगडी परिधान करण्यात आली.

राज्यघटना वाचवण्याची लढाई असल्याचे सांगून गांधी म्हणाले, की काँग्रेस, इंडिया आघाडी घटना वाचवत आहेत. मोदी, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ राज्यघटना संपवत आहे. राज्यघटना संपवल्यास मागासवर्गीय, अल्पसंख्यांकांना मिळणारे अधिकार हिरावले जातील. राज्यघटना नष्ट केल्यास देशाची ओळख राहणार नाही. मात्र, ड़ॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा गांधी यांनी जे देशाला दिले, ते संपवू देणार नाही. भाजपचे नेते कधी राज्यघटना बदलणार म्हणतात, कधी आरक्षण संपवणार म्हणतात. आरक्षणाची ५० टक्क्यांची ही कृत्रिम अट आम्ही काढून टाकणार. देशात १५ टक्के दलित, ८ टक्के आदिवासी, ५० टक्के मागासवर्गीय आहेत. उद्योगपतींचे १६ लाख कोटींचे कर्ज मोदी सरकारने माफ केले. युपीए सरकारने कर्जमाफी केली होती. २४ वर्षांचा मनरेगाचा पैसा, २४ वर्षांच्या कर्जमाफीचा पैसा २२ उद्योगपतींना देण्यात आला. खासगी क्षेत्रात मागास, अल्पसंख्यांकांचा सहभाग नाही. ते मनरेगा, मजुरी करताना दिसतील. समाजातील ९० टक्के समाजाकडे काही नाही. त्यामुळे आम्ही ९० टक्क्यांचे सरकार चालवणार आहोत. असे गांधी यांनी नमूद केले.

### रोखे घेणाऱ्यांची नावे का दडवली?

**» सर्वोच्च न्यायालयाने निवडणूक रोखे बेकायदा ठरवले. मोदी यांना राजकारण स्वच्छ करायचे होते, तर रोखे घेणाऱ्यांची नावे का दडवली? देशासमोर मोदी भ्रष्टाचार करत आहेत. देशात ऑक्सिजन, व्हेंटिलेटर नसाताना लस तयार करणारी कंपनी मोदींना पैसे देत होती, अशी टीकाही त्यांनी केली.**

---

# दहावी, बारावीच्या निकालाबाबत अपडेट

## दहावी आणि बारावीच्या परीक्षेचा निकाल लवकर जाहीर केला जाणार

**पिंपरी | प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे (राज्य मंडळ) घेण्यात आलेल्या दहावी आणि बारावीच्या परीक्षेचा निकाल गेल्यावर्षीपेक्षा लवकर जाहीर केला जाणार आहे. त्याबाबतचे संकेत राज्य मंडळानेच दिले आहेत.

राज्य मंडळाच्या नऊ विभागीय मंडळांमार्फत बारावीची परीक्षा २१ फेब्रुवारी ते २३ मार्च या कालावधीत, तर दहावीची परीक्षा १ ते २६ मार्च या दरम्यान घेण्यात आली. दहावीच्या परीक्षेसाठी १६ लाख विद्यार्थ्यांनी, तर बारावीच्या परीक्षेसाठी १५ लाखांहून अधिक विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. गेल्या काही दिवसांपासून दहावी-बारावीच्या परीक्षांच्या निकालाची चर्चा सुरू झाली आहे. त्यातून समाजमाध्यमांमध्ये निकालाच्या तारखा फिरत असल्याने संभ्रम निर्माण झाल्याचे चित्र आहे. या पार्श्वभूमीवर केंद्रीय माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने (सीबीएसई) दहावी आणि बारावीच्या परीक्षांचे निकाल २० मेनंतर जाहीर करण्यात येणार असल्याचे स्पष्ट केले आहे. त्यामुळे राज्य मंडळाकडून दहावी आणि बारावीच्या परीक्षांचा निकाल कधी जाहीर केला जाणार याबाबत उत्सुकता आहे.




गेल्या वर्षी राज्य मंडळाने बारावीच्या परीक्षेचा निकाल २५ मे रोजी, तर दहावीच्या परीक्षेचा निकाल २ जून रोजी जाहीर केला होता. मात्र यंदा गेल्यावर्षीपेक्षाही लवकर निकाल जाहीर करण्याची तयारी असल्याची माहिती राज्य मंडळाकडून देण्यात आली. त्यामुळे दहावी आणि बारावीची परीक्षा दिलेले विद्यार्थी, त्यांच्या पालकांना पुढील अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी आवश्यक ती तयारी करण्यास वेळ मिळणार आहे.

> “ राज्य मंडळाकडून दहावी आणि बारावीच्या परीक्षेचा निकाल तयार करण्याचे काम सध्या सुरू आहे. बारावीचा निकाल मे महिन्याच्या तिसऱ्या आठवड्यात, तर दहावीचा निकाल मे अखेरीस जाहीर करण्याचे नियोजन आहे. यंदा निकाल गेल्यावर्षीपेक्षा लवकर जाहीर करण्याचा प्रयत्न आहे
>
> **– शरद गोसावी, अध्यक्ष, राज्य मंडळ**

# फडणवीसांनी घेतला नगरसेवकांचा वर्ग

## सक्रीय व्हा नाहीतर महापालिकेचे तिकीट विसरा : देवेंद्र फडणवीस

**पुणे | प्रतिनिधी**

लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर भाजपचे काही नगरसेवक आणि आमदार प्रचारात सक्रीय नसल्याचे समोर आल्यानंतर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी पुण्यात पुणे, बारामती तसेच शिरूर लोकसभा मतदारसंघातील आमदार तसेच सर्व माजी नगरसेवकांचा वर्ग घेतला.

यावेळी प्रत्येकाने मतदारांपर्यंत पोहचा अन्यथा महापालिकेचे तिकिट विसरा, पक्षाकडे अनेक जण तिकिटासाठी तयार आहेत, असे सांगत नगरसेवकांना चांगलाच दम भरला. तसेच ही बाब आमदारांसाठीही लागू असेल असेही ते म्हणाले. कोरेगाव पार्क परिसरात नगरसेवकांची ही तातडीची बैठक घेण्यात आली. उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील, भाजप शहराध्यक्ष धीरज घाटे, लोकसभा समन्वयक श्रीनाथ भिमाले यावेळी उपस्थित होते.



लोकसभा निवडणुकीसाठी भाजपकडून पुण्यात मुरलीधर मोहोळ यांना उमेदवारी देण्यात आली असून काँग्रेसकडून रविंद्र धंगेकर निवडणुकीच्या मैदानात आहेत. त्यामुळे भाजपकडून कसब्याची पुनरावृत्ती टाळण्यासाठी सर्व पातळ्यांवर लक्ष केंद्रीत केले आहे. स्वत: फडणवीस पुण्यावर लक्ष ठेवून आहेत. मात्र, गेल्या काही दिवसांत शहरातील पक्षाचे काही आमदार तसेच माजी नगरसेवक प्रभागात सक्रीय नसल्याचे समोर आले आहे.

याची गंभीर दखल घेत फडणवीस यांनी प्रत्येकाने कशा प्रकारे प्रचाराचे नियोजन करावे, सोसायटी भेटी, कोपरा सभा तसेच पक्षाच्या उमेदवाराची माहिती आठ दिवसांच्या आत घरोघरी पोहचविण्याच्या सूचना केल्या आहेत. तसेच, जे लोकसभेसाठी काम करतील त्यांचाच विचार विधानसभा तसेच महापालिका निवडणुकीसाठी केला जाईल. हे लक्षात ठेऊनच काम करावे, असा कडक सूचना माजी नगरसेवकांना केली आहे.

कोरेगाव पार्क येथील एका मंगल कार्यालयामध्ये ही बैठक पार पडली. या बैठकीला भाजपचे सर्व माजी नगरसेवक उपस्थित होते. पुणे महापालिका तसेच पुणे कॅन्टोन्मेंट भागातील नगरसेवकांचा आणि पदाधिकाऱ्यांचा समावेश होता. भाजपाच्या शहरातील आमदार देखील या बैठकीला उपस्थित होते. शहराध्यक्ष सरचिटणीस उपाध्यक्ष सचिव तसेच राज्य पातळी संघटनेचे पदाधिकारी देखील यावेळी हजर होते.

लोकसभा निवडणूक भाजपासाठी (BJP) अत्यंत महत्त्वाची असल्याने या निवडणुकीच्या काळात कोणतीही चूक करू नका. प्रकार आता अंतिम टप्प्यात आलेला आहे त्यामुळे आपल्या भागात बरोबर जाऊ मतदारांची भेट घ्या. महायुतीच्या माध्यमातून निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराची माहिती मतदारांना द्या. मतदानाच्या दिवशी अधिकधिक मतदार मतदान केंद्रांवर कसे येते यासाठी आवश्यक ती यंत्रणा उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न करावा, अशा सूचना फडणवीस यांनी माजी नगरसेवकांना केल्या.

### काम न करणाऱ्यांची माझ्यकडे यादी...

**» यावेळी फडणवीस यांनी लोकसभा निवडणुकीचे काम करत नसलेल्या १० ते १२ नगरसेवकांची यादीच आपल्याकडे आली असून त्यांच्याशी चंद्रकांत पाटील व्यक्तिगत स्वरूपात बोलतील, असे सांगितले. त्यानंतरही संबंधित नगरसेवक पक्षाच्या प्रचारात दिसले नाहीत तर पक्ष त्यांची योग्य दखल घेइल, असा गर्भित इशाराही फडणवीस यांनी यावेळी दिला आहे.**

# पुण्यात 'एमआयएम' शक्तीप्रदर्शन करणार

## ग्राऊंड रिपोर्ट: निवडणूक रणसंग्राम, महायुतीची 'मुरली' सुसाट; धंगेकर, मोरे कोमात!

**पुणे | प्रतिनिधी**

'राज्यात ऑल इंडिया मजलिस-ए-इत्तेहादुल मुस्लीमीन अर्थात 'एमआयएम'च्या विस्तारावर लक्ष केंद्रित करण्यात आले असून, विधानसभा आणि महापालिका निवडणुकांत पक्षाची शहरातील ताकद दिसेल,' असा दावा पुणे लोकसभा मतदारसंघातील 'एमआयएम'चे उमेदवार अनीस सुंडके यांनी केला आहे. विशेष म्हणजे, सुंडके यांच्या प्रचारासाठी 'एमआयएम'चे प्रमुख असदुद्दीन ओवेसी यांची ७ मे रोजी पुण्यात सभा आयोजित करण्यात आली आहे, असेही त्यांनी नमूद केले. सभेचे ठिकाण मात्र अद्याप निश्चित करण्यात आलेले नाही. या सभेमुळे भाजपाविरोधी मतांचे विभाजन होईल आणि महायुतीला फायदा होईल, असे निरीक्षण राजकीय जाणकारांनी नोंदवले आहे.



सुंडके यांनी पुण्यातील एका अग्रेसर वृत्तपत्राच्या कार्यालयास भेट दिली. त्या वेळी त्यांनी संवाद साधला. ते म्हणाले, की विधानसभा, महापालिका निवडणुका डोळ्यासमोर ठेवून आतापासून काम सुरू केले आहे. पुणे शहरात 'एमआयएम'चा एक आमदार आणि महापालिकेत ३० नगरसेवक निवडून आणण्याचे उद्दिष्ट आहे. त्या दृष्टीने मुस्लिम समाजातील कार्यकर्त्यांशी आतापासून संवाद साधण्यास सुरुवात केली आहे, असेही सुंडके यांनी म्हटले आहे.

पुणे लोकसभा मतदार संघात भाजपा-शिवसेना-राष्ट्रवादी-आरपीआय व मित्र पक्ष महायुतीचे अधिकृत उमेदवार म्हणून मुरलीधर मोहोळ मैदानात आहेत. काँग्रेस-राष्ट्रवादी शरद पवार आणि शिवसेना उबाठा व घटक पक्ष महाविकास आघाडीकडून रविंद्र धंगेकर आणि वंचित बहुजन आघाडीकडून वसंत मोरे आमने-सामने आहेत. त्यामुळे ही निवडणूक त्रिशंकू होणार आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सभेनंतर पुण्यातील वातावरण महायुतीच्या बाजुने झुकले होते. त्यानंतर शुक्रवारी काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी सभा घेतली. या सभेलाही पुणेकरांनी प्रतिसाद दिला. त्यामुळे महायुती विरुद्ध महाविकास आघाडी असा सामना चुरशीचा होईल, असा दावा केला जातो.

### मराठा, धनगर आरक्षणाचा मुद्दा "बुमरँग"

**» महाविकास आघाडीची राज्यात सत्ता असताना मराठा-धनगर आरक्षणाचा निर्णय घेत हा विषय 'क्रेडिट' करण्याची संधी होती. मात्र, महाविकास आघाडीचे सर्वेसर्वा शरद पवार किंवा माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी याबाबत ठाम भूमिका घेतली नाही. यासह मराठा आरक्षणाचे आश्वासन म्हणून 'ओबीसी' समाजाला डिवचल्याचा प्रकार आहे. पुणे लोकसभा मतदार संघात ओबीसी समाज निर्णायक आहे. तसेच, अनुसूचित जाती-जमातीच्या मतदारांमध्येही सर्वसाधारण गटातील समाजाला आरक्षण देण्याच्या भूमिकेला अप्रत्यक्ष विरोध आहे. परिणामी, मराठा आणि धनगर आरक्षणाच्या आश्वासनाचे 'गाजर' दाखवण्याचा मुद्दा काँग्रेससाठी 'बुमरँग' होण्याची शक्यता सर्वाधिक आहे.**

# निवडणूक महायुतीसाठी ठरली आव्हानात्मक

## श्रीरंग बारणे यांना अहंकार निर्माण झाल्याचा पलटवार संजोग वाघेरे यांनी केला

**पिंपरी | प्रतिनिधी**

विरोधी उमेदवार कोण आहे, हे माहिती नसल्याचे विधान केल्याने राजकारण होण्याची चिन्हे दिसताच बारणेंनी सारवासारव केली. पण, बारणे यांना अहंकार निर्माण झाल्याचा पलटवार वाघेरे यांनी केला.

मावळमधील सहाही विधानसभा मतदारसंघांत घटक पक्षांचे आमदार, महापालिका, नगरपरिषदांवर सत्ता राहिल्याने सुरुवातीला महायुतीला सोपी वाटणारी निवडणूक आव्हानात्मक बनल्याचे चित्र आहे. घटक पक्षांच्या नेत्यांच्या कामगिरीवर लक्ष ठेवण्यासाठी दिल्लीतील खास पथक मावळात आल्याने महायुतीत संशयाचे धुके निर्माण झाले. दुसरीकडे, महाविकास आघाडीला सहानुभूती असल्याचे काही ठिकाणी जाणवते, परंतु नेते-कार्यकर्ते आघाडी म्हणून लोकांपर्यंत पोहोचत नसल्याचे, तसेच सहानुभूतीचा फायदा घेण्यात कमी पडल्याचे निरीक्षण आहे.






पुणे आणि रायगड जिल्ह्यात विभागलेल्या मावळ लोकसभा मतदारसंघात शहरी, निमशहरी, ग्रामीण भाग येतो. पहिल्यांदाच शिवसेनेसमोर राष्ट्रवादीचे 'घड्याळ' नसून उद्धव ठाकरेंची 'मशाल' आहे. दोन्ही उमेदवार पिंपरी-चिंचवडमधील स्थानिक आहेत. मतदारसंघातील सहाही विधानसभा मतदारसंघांत महायुतीमधील घटक पक्षांचे आमदार आहेत. पिंपरी-चिंचवड, पनवेल या महापालिकांसह लोणावळा, तळेगाव दाभाडे नगरपरिषदेवर भाजपची सत्ता होती, तर वडगाव, देहूगावमधील नगरपंचायतीवर राष्ट्रवादीची सत्ता राहिली. कागदावर महायुतीची ताकद असल्याने सुरुवातीला महायुतीचे उमेदवार श्रीरंग बारणे यांच्यासाठी निवडणूक सोपी दिसत होती. परंतु, महायुतीसोबत असलेले उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे निकटवर्तीय संजोग वाघेरे यांना शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे या पक्षाने उमेदवारी दिल्याने निवडणुकीत रंगत आली. वाघेरेंनी पिंपरी-चिंचवड, मावळमध्ये नात्यागोत्यांचा आधार, जुन्या पक्षातील सहकाऱ्यांची मदत घेत प्रचार सुरू केला.

विरोधी उमेदवार कोण आहे, हे माहिती नसल्याचे विधान केल्याने राजकारण होण्याची चिन्हे दिसताच बारणेंनी सारवासारव केली. पण, बारणे यांना अहंकार निर्माण झाल्याचा पलटवार वाघेरे यांनी केला. त्यानंतर बारणे यांनी वैयक्तिक बोलणे टाळून समोरच्या उमेदवाराने विकासकामांवर बोलावे, तसेच विरोधकांकडे बोलण्यासारखे काहीच नसल्याचे सांगण्यावर भर दिला. वाघेरे यांचे आव्हान दिसू लागल्याने मतविभागणीसाठी त्यांच्याशी नामसाधर्म्य असलेले उमेदवार उभे करण्याची खेळी महायुतीने खेळली. त्यातील संजय वाघेरे यांचा अर्ज बाद झाला, तर संजोग पाटील निवडणुकीच्या रिंगणात आहेत. बारणे यांचा उमेदवारी अर्ज भरण्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आले, पण काहीही न बोलता निघून गेले. उपमुख्यमंत्री अजित पवारांचा बालेकिल्ला असतानाही पिंपरी-चिंचवडमध्ये एकाच मेळाव्याला त्यांनी हजेरी लावली.

पवारांच्या 'राष्ट्रवादी'तील पदाधिकाऱ्यांशी वाघेरे यांचे जिव्हाळ्याचे संबंध असल्याने अनेक कार्यकर्ते त्यांचा प्रचार करताना दिसतात. भाजपचेही काही पदाधिकारी मनापासून काम करत नसल्याचे सांगितले जाते. परिणामी, महायुतीमधील पदाधिकाऱ्यांच्या कामावर बारकाईने नजर ठेवण्यासाठी दिल्लीतील सहा जणांचे पथक मावळात दाखल झाले. या पथकामुळे महायुतीत संशयाचे धुके निर्माण झाले असून, अस्वस्थता असल्याचे दिसते. वाघेरे यांचा उमेदवारी अर्ज भरण्यासाठी आलेले आदित्य ठाकरे यांनी बारणे यांच्यावर हल्ला करण्याचे टाळले. त्या तुलनेत आमदार रोहित पवार यांनी बारणे यांच्यावर हल्ला करतानाच उपमुख्यमंत्री अजित पवारांनी पुत्र पार्थचा पराभव पचविला असेल, पण मी भावाच्या पराभवाचा बदला घेणार असल्याचे सांगून उपरोधिक टोला लगावला.

### अखेरच्या टप्प्यात प्रचारात रंगत

» उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर मतदारसंघात महायुती, महाविकास आघाडीचे राज्यस्तरीय नेते प्रचारासाठी आले नाहीत. बारामती लोकसभा मतदारसंघासाठी ७ मे रोजी मतदान पार पडल्यानंतर मावळातील प्रचारात रंगत येईल. नेत्यांच्या सभांचा धडाका सुरू होईल, असे दिसते.

# मतदान जनजागृतीसाठी एलईडी व्हॅनचे उद्घाटन..

## मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी महापालिकेच्या वतीने विविध उपक्रम

**पिंपरी | प्रतिनिधी**

शहरातील नागरिकांमध्ये मतदानाबद्दल जनजागृती करण्यासाठी तसेच मतदार नोंदणी आणि मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी महापालिकेच्या वतीने विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. या उपक्रमांमध्ये नागरिकांचाही प्रतिसाद तितकाच महत्वाचा असून लोकशाहीच्या महाउत्सवात सामिल होऊन देशाच्या हितासाठी घेतलेल्या निर्णयांमध्ये आपले म्हणणे मांडण्यासाठी मतदारांनी उस्फूर्तपणे आपल्या मताचा अधिकार बजवावा, असे आवाहन आयुक्त शेखर सिंह यांनी केले.



सार्वत्रिक लोकसभा निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने नागरिकांमध्ये मतदानाविषयी जागरूकता निर्माण व्हावी यासाठी २ एलईडी व्हॅनद्वारे प्रचार, प्रसिद्धी करण्यात येणार आहे. या व्हॅनचे उद्घाटन आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांच्या हस्ते पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय इमारतीच्या प्रांगणात करण्यात आले, त्यावेळी ते बोलत होते.

या उद्घाटन प्रसंगी अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे, आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे उप आयुक्त आण्णा बोदडे, सहाय्यक आयुक्त अविनाश शिंदे यांच्यासह महापालिका अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

शहरातील मतदानाचा टक्का वाढावा आणि नागरिकांमध्ये मतदानाबाबत जागरूकता निर्माण व्हावी यासाठी एलईडी व्हॅनच्या माध्यमातून चित्रफित दाखवून जनजागृती करण्यात येणार आहे. या एलईडी व्हॅन पिंपरी चिंचवड महापालिकेच्या हद्दीतील वर्दळीची ठिकाणे, उद्याने, रुग्णालये, सिनेमाघरे तसेच महत्वाचे चौकांमध्ये देखील या व्हॅनद्वारे जनजागृती करण्यात येणार आहे.

पिंपरी चिंचवड शहरातील महत्वाच्या मार्गांवर उद्या दि. ४ मे रोजी सकाळी ८ वाजता भव्य बाईक रॅलीचे आयोजन करण्यात आले असून त्याद्वारे जनजागृती आणि वातावरण निर्मिती केली जाणार आहे, असेही सहाय्यक आयुक्त शिंदे यावेळी म्हणाले.

### मतदान जनजागृतीबाबत प्रचार

» महत्वाच्या शंभर चौकांमध्ये या व्हॅनच्या माध्यमातून नागरिकांना प्राप्त झालेल्या मताच्या अधिकाराबद्दल जाणीव जागृती करून मतदानासाठी प्रोत्साहित केले जाणार आहे. महापालिकेच्या वतीने मतदारांना आपला मताधिकार बजावण्यासाठी विविध कार्यक्रम, उपक्रम तसेच माध्यमांचा वापर करून मतदान प्रक्रियेबद्दल माहिती दिली जात आहे.अनेक कार्यक्रमांमध्ये मतदान करण्याची शपथही देण्यात येत आहे. शिवाय पथनाट्य, जिंगल्स, सांस्कृतिक कार्यक्रम इ. माध्यमांद्वारे मतदान जनजागृतीबाबत प्रचार केला जात आहे, अशी माहिती निवडणूक विभागाचे सहाय्यक आयुक्त अविनाश शिंदे यांनी दिली आहे.

# शिरूरमध्ये सत्तेचा गैरवापर:अमोल कोल्हे

## सभेला जाऊ नये म्हणून कार्यकर्त्यांना नोटिसा पाठविल्याचा आरोप

**पुणे | प्रतिनिधी**

महायुतीचे पर्यायी (डमी) उमेदवार शिवाजीराव आढळराव-पाटील यांना पराभव स्पष्ट दिसत असल्याने सत्तेचा गैरवापर केला जाऊ लागला आहे, असे अमोल कोल्हे यांनी म्हटले आहे.

महायुतीचे पर्यायी (डमी) उमेदवार शिवाजीराव आढळराव-पाटील यांना पराभव स्पष्ट दिसत असल्याने सत्तेचा गैरवापर केला जाऊ लागला आहे. त्यांना कार्यकर्त्यांची भीती वाटायला लागली आहे. दत्तक घेतलेल्या गावातील लोकांवरच दडपशाही केली जात आहे. सभेला जाऊ नये, म्हणून कार्यकर्त्यांना नोटिसा पाठविल्याचा आरोप शिरूरचे महाविकास आघाडीचे उमेदवार डॉ. अमोल कोल्हे यांनी केला. हडपसर विधानसभा मतदारसंघातील प्रचारावेळी डॉ. कोल्हे बोलत होते. माजी आमदार महादेव बाबर, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे शहराध्यक्ष प्रशांत जगताप, ठाकरे गटाचे शहरप्रमुख संजय मोरे या वेळी उपस्थित होते.




ही निवडणूक आता माझी राहिली नाही. सर्वसामान्य जनतेने हातात घेतली आहे. भोसरी, हडपसर, जुन्नर, खेड, आंबेगाव, शिरूरमध्ये प्रत्येक ठिकाणी जनतेचा निर्णय झाला आहे. जनता आता फक्त मतदानाची वाट पाहत असल्याचे सांगत डॉ. कोल्हे म्हणाले, की तीन वेळा खासदार राहिलेल्या शिवाजीराव आढळराव-पाटील यांनी दत्तक घेतलेल्या करंजविहिरे गावामधील महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांना पोलिसांनी सभेला जाऊ नये, यासाठी नोटिसा पाठविल्या. आढळराव यांना कार्यकर्त्यांची भीती वाटायला लागली आहे. दत्तक घेतलेल्या गावातील लोकांवरच दडपशाही केली जात आहे. नोटिसा पाठविण्याची वेळ येत असेल तर आढळराव यांना पराभव स्पष्ट दिसायला लागला आहे. दडपशाही सुरू असून दबाव टाकण्याचा प्रयत्न केला जात आहे. स्वार्थासाठी सरपटणाऱ्यांच्या गर्दीत जाण्यापेक्षा स्वाभिमानासाठी लढणाऱ्यांच्या रांगेत जनता उभी आहे.

2019 साली जेव्हा मी संसदेत मी निवडून गेलो तेव्हा मी नवीन होतो म्हणून मी माहिती घेतली की, यापूर्वी खासदार असलेल्या महोदयांनी नेमके संसदेत कोणते प्रश्न विचारले आहेत. तेव्हा समजलं की, काही लोकं केवळ आपला व्यवसाय करण्यासाठी संसदेत गेले. शिरुर, जुन्नर, आंबेगाव, खेड या भागात ज्या खात्याचा काहीही संबंध नाही त्या खात्याचे संसदेत प्रश्न मांडण्याचा नेमका हेतू काय असावा असा सवालही खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी उपस्थित केला. संसदेत सामान्य जनतेचे आणि सर्वसामान्य शेतकऱ्यांचे प्रश्न मांडण्याची आवश्यकता असताना मात्र केवळ व्यापार करण्यासाठी माजी खासदार संसदेत गेले असल्याचे पुन्हा अमोल कोल्हे म्हणाले आहेत.

### कोल्हे यांनी काहीच कामे केली नाहीत : आढळराव

» 'मतदारसंघाचा विकास करण्यासाठी मी निवडणुकीला उभा आहे. कोणावर टीका करणार नाही. देशात पुन्हा मोदी यांचे सरकार येणार आहे. राज्यात महायुतीचे सरकार आहे. त्यामुळे त्याच विचारांचा प्रतिनिधी असेल तर निधी आणायला अवघड जाणार नाही. अनेक प्रकल्प मला प्रत्यक्षात उतरवायचे आहेत,' असे शिवाजीराव आढळराव-पाटील म्हणाले. ते म्हणाले, की मी जिथे जिथे जातो, तेथील लोक आम्ही चुकलो असे सांगतात. खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी लोकांची काहीच कामे केली नाहीत. त्या आधी १५ वर्षांत मी ठळक कामे केली आहेत. समाजमाध्यमावर माझ्याबाबत नकारात्मक वातावरण तयार करण्यात आल्याचेही आढळराव यांनी स्पष्ट केले.

# पुणे जिल्ह्यातील धरणांनी गाठला तळ

## गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा उपलब्ध पाणीसाठ्याची अवस्था खूपच बिकट

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे जिल्ह्यातील धरणांमधील पाणीसाठ्याने अक्षरशः तळ गाठला आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा उपलब्ध पाणीसाठ्याची अवस्था खूपच बिकट झाली आहे.

पुणे - पुणे जिल्ह्यातील धरणांमधील पाणीसाठ्याने अक्षरशः तळ गाठला आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा उपलब्ध पाणीसाठ्याची अवस्था खूपच बिकट झाली आहे. सद्यःस्थितीत जिल्ह्यातील २६पैकी एक धरण ठणठणीत कोरडे पडले असून, उजनीतील अचल पाणीसाठ्यानेही तळ गाठला आहे.

उजनीतील अचल पाणीसाठाही ४३ टक्क्यांनी कमी झाला आहे. आजघडीला जिल्ह्यातील सर्व धरणांमध्ये मिळून फक्त २७.८३ टीएमसी उपयुक्त पाणीसाठा शिल्लक राहिला आहे.



एकूण पाणीसाठ्याचे हे प्रमाण अवघे १४.०३ टक्के इतके आहे.

सध्याचा उपलब्ध उपयुक्त पाणीसाठा हे गेल्या वर्षीच्या तुलनेत १८.७५ टीएमसी इतका कमी आहे. गेल्या वर्षीच्या आजच्या तारखेला ४६.५८ टीएमसी पाणीसाठा शिल्लक होता. गतवर्षीच्या आजच्या तारखेच्या उपलब्ध उपयुक्त पाणीसाठ्याचे हे प्रमाण २३.४८ टक्के इतके होते. गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा धरणांमधील उपलब्ध पाणीसाठा हा ९.४५ टक्क्यांनी कमी झाला आहे.

पुरंदर तालुक्यातील नाझरे धरण कोरडे पडले असून, उजनीतील उपयुक्त पाणीसाठा उणे ४२.९८ टक्के इतका आहे. आतापर्यंत उजनी धरणातील अचल (मृतसाठा) साठ्यातील २३.०२ टीएमसी (४२.९८) टक्के पाणी वापरले आहे.

### 'टाटां'च्या धरणांत 15.65 टीएमसी पाणी

» जिल्ह्यात टाटा उद्योग समूहाची सहा धरणे आहेत. त्यामध्ये मुळशी, ठोकळवाडी, शिरोटा, वळवण, लोणावळा आणि कुंडली यांचा समावेश आहे. या सहा धरणांची एकूण पाणी साठवण क्षमता ४२.७६ टीएमसी इतकी आहे. यापैकी सध्या १५.६५ टीएमसी (३६.६० टक्के) उपयुक्त पाणीसाठा शिल्लक आहे.

| प्रमुख धरणांमधील आजचा साठा (टीएमसीमध्ये) | |
|---|---|
| पवना | २.८२ |
| चासकमान | १.१९ |
| भामा आसखेड | १.९३ |
| आंद्रा | १.११ |
| गुंजवणी | ०.९० |
| भाटघर | २.५० |
| नीरा देवघर | ०.९७ |
| वीर | ३.१६ |
| माणिकडोह | ०.३७ |
| येडगाव | ०.३४ |
| डिंभे | २.१६ |

| टाटा समूहाच्या धरणांतील पाणीसाठा (टीएमसीमध्ये) | |
|---|---|
| मुळशी | ५.४४ |
| ठोकळवाडी | ५.५१ |
| शिरोटा | ४.१५ |
| वळवण | ०.४२ |
| लोणावळा | शून्य |
| कुंडली | ०.१३ |